जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ४०५ दिनांक - ०३/०६/२०२३**

## सिंहगड रोड पोलीस स्टेशन पुणे शहर

## पिस्टल विक्री साठी येणा-या आरोपी कडुन एक पिस्टल व एक जिवंत काडतुस केले हस्तगत

दि.३०/०५/२०२३ सिंहगड रोड पोलीस स्टेशन् हद्दीत अधिकारी व स्टाफ असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सिंहगड रोड पो स्टे पुणे याचे आदेशाने गुन्हयाना आळा घालण्यासाठी व रेकॉर्डवरील आरोपी तसेच संशयीत इसम यांना चेक करण्याकरीता गुन्हे प्रतिबंधात्मक पेट्रोलिंग करत असताना **पोलीस अंमलदार अमोल तांबे व माने** यांना त्याचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की एक इसम हातात लाल पिशवी घेवुन ग्रॅन्ड व्ह्यु हॉटेल जवळ न-हे पुणे येथे पिस्टल विक्रीसाठी घेवुन येणार आहे अशी खाञीशीर बातमी मिळाल्याने सदरची बातमी सपोनि राहुल यादव यांना कळविली असता त्यांनी ती वरिष्ठांना कळवुन वरिष्ठांनी योग्य ती कारवाई करण्याचे आदेशित केले.

सदर बातमीच्या ठिकाणी जावुन मिळालेल्या बातमीप्रमाणे खात्री करता बातमीतील वरील वर्णनाचा इसम सदर ठिकाणी उभा असल्याचे दिसल्याने. तो त्या ठिकाणावरुन नजर चुकवुन पळुन जाण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यास स्टाफचे मदतीने काही अंतरावर त्याला शिताफीने पकडुन त्यास त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव **वैभव विजय वाल्हेकर, वय २९ वर्षे, धंदा चहाची टपरी, रा. मु.पो.कामथडी, ता. भोर, जि. पुणे** असे सांगितले असता त्याची अंगझडती घेता त्याचे डावे बाजुचे कंबरेस पॅन्टच्या आत मध्ये एक ३०,०००/-रुपये किंमतीचे एक गावठी पिस्टल व ३००/-रुपये किंमतीचे एक जिवंत काडतुसे असा एकुण ३०,५००/-रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त कर्ण्यात आले असुन पुढील तपास पोलीस उप निरीक्षक गणेश मोकाशी हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परीमंडळ ३,पुणे शहर श्री.सुहेल शर्मा मा.सहा पोलीस आयुक्त, सिंहगड रोड विभाग श्री राजेंद्र गलांडे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, सिंहगड रोड पोलीस स्टेशन श्री अभय महाजन, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.जयंत राजुरकर यांचे मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक श्री राहुल यादव,पोलीस उप निरीक्षक गणेश मोकाशी पोलीस अंमलदार, कुंभार,रविंद्र आहिरे,अमोल तांबे,माने यांचे पथकाने केली.


सिंहगडरोड पोलीस स्टेशन
पुणे